**नि.क्र. १० वर आदेश**
(पारित दिनांक ०२.०७.२०१८)

कौटुंबीक हिंसाचारापासून महिलांचे संरक्षण कायदा, २००५ कलम १२ अन्वये प्रस्तूत प्रकरण दाखल करण्यात आले आहे. मुळ अर्जाचा अंतिम निकाल लागेपर्यंत गैरअर्जदार क्र.१ कडून अर्जदारांना प्रत्येकी रक्कम रू. ५,०००/- प्रतीमाह अंतरीम पोटगी मिळावी याकरीता प्रस्तूत अर्ज दाखल करण्यात आला आहे.

२. अर्जातील कथन असे की, गैरअर्जदार क्र. १ हा अर्जदार क्र. १ चा पती व उर्वरित अर्जदारांचा पिता आहे. गैरअर्जदारांनी लग्नानंतर २ ते ४ महिने अर्जदार क्र. १ ला निट नांदविले. त्यानंतर उर्वरित गैरअर्जदारांचे ऐकून गैरअर्जदार क्र. १ ने अर्जदार क्र. १ हिला मारहाण व त्रास देणे सुरू केले. दि. ०३.१०.१६ रोजी अर्जदार क्र. १ हिने तिचे नावे असलेली शेती गैरअर्जदारांचे नावे न केल्याचे कारणावरून त्यांनी अर्जदार क्र. १ हिला शिवीगाळ करून मारहाण केली व जिवे मारण्याची धमकी दिली. अर्जदारांनी घरातून बाहेर निघून जावे याकरीता गैरअर्जदारांनी वारंवार अर्जदार क्र. १ ला मारहाण व शिवीगाळ केली. दि. ०५.०३.१७ रोजी देखील गैरअर्जदारांनी संगनमताने अर्जदार हिला शिवीगाळ करून तिचे अंगावर ॲसिड फेकण्याचा प्रयत्न केला. अर्जदार हे घरकुल योजनेतून प्राप्त घरात राहत असून ते घर विकता यावे याकरीता गैरअर्जदार त्यांचा छळ करीत आहेत. अर्जदारांना उदरनिर्वाहासाठी कोणतेही साधन नाही. गैरअर्जदार क्र. १ हा एका कंपनीत नोकरी करीत होता. ती कंपनी बंद झाल्याने त्याला रु. २,००,०००/- मिळाले आहे. गैरअर्जदार क्र. १ हा ठेकेदारी करीत असून त्यास ठेकेदारीतून दरमाह रु. २०,०००/- उत्पन्न मिळत असल्याचे अर्जदारांनी कथन केले आहे. अर्जदारांवर उपासमारीची वेळ आल्यामुळे अंतरिम पोटगीबाबत आदेश पारित करण्याची विनंती केली आहे.

३. प्रस्तूत प्रकरणाचा समन्स मिळाल्यावर गैरअर्जदार हजर झाले. त्यांनी लेखी जबाब (नि.क्र. ११) नुसार दाखल केला आहे. सदर लेखी जबाब हाच अंतरीम पोटगी मिळणेकरीता करण्यात आलेल्या अर्जाचा देखील जबाब समजण्यात यावा असे त्यांनी पुरसिस (नि.क्र. १२) व्दारे कळविले आहे. त्यांनी अर्जदारांसोबतचे नातेसंबंध सोडल्यास संपुर्ण कथन नाकारले आहे. त्यांनी अर्जदार क्र. १ चा छळ केल्याचे कथन स्पष्टपणे नाकारले आहे. त्यांनी असे कथन केले आहे की, त्यांची आर्थिक परिस्थिती नाजूक आहे. सबब, गैरअर्जदार क्र. १ हा पोटगीची रक्कम भरण्यास असमर्थ आहे. तो नोकरी करीत असलेली कंपनी बंद झाल्याने आता त्याला उत्पन्नाचे कोणतेही साधन नाही. उलटपक्षी, अर्जदार क्र. १ ही होमगार्ड म्हणून काम करीत असल्याने तिला उत्पन्नाचे साधन आहे. सबब, ती स्वत:चे तथा उर्वरित अर्जदारांचे पालन-पोषण करण्यास समर्थ आहे. सबब, प्रस्तूत अर्ज खारीज व्हावा अशी मागणी त्यांनी केली आहे.

४. उलटपक्षी, अर्जदार क्र. १ ने प्रस्तूत अर्जाच्या पुष्टयर्थ तिचे शपथपत्र देखील दाखल केले आहे. उभय पक्षातील नातेसंबंध अमान्य करण्यात आलेले नाही. अर्जदार क्र. १ ही होमगार्ड म्हणून काम करीत असल्याचे दर्शविणारा कोणताही पुरावा अभिलेखावर सादर करण्यात आलेला नाही. तसेच, उर्वरित अर्जदार अज्ञान असून ते शिक्षण घेत आहेत. सबब, त्यांना उत्पन्नाचे कोणतेही साधन निश्चितपणे नाही. अशा परिस्थितीत अर्जदार क्र. १ ला स्वत:चा तथा तिचे अपत्यांचा सांभाळ करण्यास तिचे नातेवाईकांवर अवलंबून राहणे भाग पडते आहे. निश्चीतपणे, अर्जदारांचा सांभाळ करण्याची जबाबदारी गैरअर्जदार क्र. १ वर आहे. मात्र, अर्जदारांचे पालन-पोषणाकरीता गैरअर्जदार क्र. १ ने काय तजवीज केली याबाबत त्याने मौन बाळगले आहे. यावरून गैरअर्जदार क्र. १ याने अर्जदारांचा सांभाळ करण्यात कसूर करीत असल्याचे सकृत दर्शनी दिसून येते. अंतिम निकालाचे वेळी अर्जदरांचा सांभाळ करण्यास गैरअर्जदार क्र. १ ने कसुर केली आहे अथवा कसे याबाबतचे पुराव्याचा उहापोह निश्चितच होईल. मात्र,

त्याकरीता काही कालावधी निश्चितपणे लागणार आहे. दरम्यानच्या काळात अर्जदारांच्या उदरनिर्वाहाची सोय करणे गरजेचे अत्यंत गरजचे आहे.

५. गैरअर्जदार क्र. १ याचे म्हणण्यानुसार तो मजूरी करीत असल्याचे ग्राहय धरले तरी देखील त्याचेकडे निश्चीतच उत्पनाचे साधन आहे. पुर्वी तो कंपनीत काम करीत होता हे त्याने स्विकार केले आहे. त्या नोकरीतून त्याला प्रतीमाह रु. २०,०००/- पगार मिळत होता असे अर्जदारांचे कथन आहे. सदर कथन त्याने नाकारले आहे. मात्र, त्याचा निश्चित पगार किती होता याबाबत त्याने कोणताही खुलासा केलेला नाही. अशा परिस्थितीत अंतरीम पोटगीचा अर्ज निकाली काढतांना अर्जदारांव्दारे कथन करण्यात आलेले गैरअर्जदार क्र. १ चे उत्पन्न ग्राहय धरता येईल. जरी, गैरअर्जदार क्र. १ नोकरी करीत असलेली कंपनी बंद झाली असली तरी देखील गैरअर्जदार क्र. १ हा प्रतीमाह रु. २०,०००/- कमवू शकतो हे तथ्य त्यातून उध्दृत होते. सबब, गैरअर्जदारास उत्पन्नाचे स्त्रोत असल्याचे प्रथम दर्शनी दिसून येते. करीता, गैरअर्जदार क्र. १ हा त्याच्या उत्पन्नातून अर्जदारांना पोटगी देवू शकतो. सध्याचे जिवनावश्यक वस्तूचे आर्थिक मूल्य, अर्जदारांचे वय, त्यांच्या गरजा लक्षात घेता अर्जदारांना प्रतीमाह रक्कम रू. २,०००/- अंतरिम पोटगी म्हणून गैरअर्जदार क्र. १ याने प्रस्तूत अर्ज दाखल केल्याचे तारखेपासून दयावी असे आदेश पारित करणे न्यायोचीत होईल. परिणामी, मी खालीलप्रमाणे आदेश पारित करीत आहे :

## ***आदेश***

१. अर्ज अंशत: मंजूर करण्यात येत आहे.

२. गैरअर्जदार क्र. १ याने अर्जदारांना दरमहा रक्कम रू. २,०००/-अंतरीम पोटगी म्हणून अर्ज दाखल तारखे पासुन ते मुळ अर्जाचा निकाल लागेपर्यंत दयावे.

दिनांक : ०२.०७.२०१८

**(मंदार प्र. पांडे)**
न्यायदंडाधिकारी, प्रथमवर्ग, मौदा.